मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# जाधववाडी सीएनजीपंप ते बोऱ्हाडेवाडी डीपी रस्ता लवकर विकसित करा

## नागरिकांकडून केली जातेय मागणी, उखडलेल्या रस्त्यामुळे वाहनचालक त्रस्त

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** जाधववाडी तील सीएनजीपंप ते पुणे-नाशिक महामार्गापर्यंत बोऱ्हाडेवाडीतील ३१ मी.डीपी रस्ता दोन्ही बाजूने उखडला आहे. त्यामुळे वाहनचालकांना गाडी चालवताना नाहक त्रास होतो आहे. त्यामुळे लवकरात-लवकर हा रस्ता विकसित करावा अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.



या परिसरात महत्त्वपूर्ण प्रकल्प साकारले जात आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा, आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र, अभियांत्रिकी महाविद्यालय असे प्रकल्प सुरु असल्याने, अर्बन स्ट्रिंट डिजाईननुसार रस्त्याला मंजुरी मिळाली आहे. मात्र सद्यास्थितीत वाहनचालकांना आणि नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करणे अवघड झाले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजू उखडलेल्या आणि खाली-वर असा अंतर असल्याने दुचाकी चालवताना कठीण जात आहे.



“ बोऱ्हाडेवाडीती ३१ मी.डीपी रस्त्याच्या कामास सुरुवात झाली आहे. त्यामुळे या रस्त्यावरून होणारी अवजड वाहतूक वळविण्यात आली आहे. या परिसरात शहरातील सर्वात महत्त्वपूर्ण प्रकल्प साकारले जात आहेत. त्यानुसार रस्ताही सुसज्ञ व्हावा अशी मागणी आमदार महेश दादा लांडगे यांच्याकडे केली होती. त्या मागणीला यश आले असून, लवकरच हा रस्ता विकसित केला जात आहे. अर्बन स्ट्रिंट डिजाईननुसार हा रस्ता होत आहे. नागरिकांसाठी सायकल ट्रेक, सुसज्ञ फुटपाथ, रस्त्याच्या कडेला ओपन जीम असणार आहे.

–सारिका बोऱ्हाडे, माजी नगरसेविका



“ या ३१ मी.डीपी रस्त्याच्या कामाला सुरुवात केली आहे. ३६ महिन्यांचा कालावधी ठेकेदाराला दिलेला आहे. लवकरात-लवकर हा रस्ता पूर्ण करण्यासाठी काम प्रगतीपथावर आहे. व्ही.एम.मातेरे या संस्थेला रस्त्याच्या विकासाचे काम दिले आहे.

–देवन्ना गट्टूवार, कार्यकारी अभियंता स्थापत्य विभाग

# स्पर्श कोविड केअर सेंटरकडून सव्वातीन कोटी वसूल करा

## आयुक्त शेखर सिंह यांनी दिला रक्कम वसूल करण्याचा आदेश

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कोविड काळामध्ये स्पर्श संस्थेने तीन कोविड केअर सेंटर उभारले होते. त्यातील दोन सेंटरमध्ये कोणत्याही सुविधा व रुग्णही नव्हते. तरीही तीन कोटी २९ लाख ४० हजार रुपयांचे बील महापालिकेकडे सादर करून रक्कम घेतले होती. या प्रकरणाची चौकशी सुरू होती. त्यात सत्यता आढळल्याने ही रक्कम वसूल करण्याचा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे. त्यानुसार स्पर्शने ऑटो क्लस्टरमध्ये उभारलेल्या कोविड केअर सेंटरचे प्रलंबित बिल व अनामत रकमेतून सदर रक्कम वर्ग करून घेण्यात येणार आहे. कोरोनाच्या कालावधीत रुग्णांना जलद आणि चांगली सुविधा उपलब्ध व्हावी व रुग्णांना क्वारंटाइन करण्यासाठी कोविड सेंटरची उभारणी खासगी भागीदारामार्फत करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला होता. त्यात स्पर्श हॉस्पिटलचाही समावेश होता. त्यांनी ऑटो क्लस्टरसह भोसरीतील रामस्मृती मंगल कार्यालय आणि हिरा लॉन्स या दोन ठिकाणी प्रत्येकी तीनशे खाटांचे कोविड केअर सेंटर उभारले होते. मात्र, स्पर्शने संबंधित ठिकाणी कोणतीही सुविधा दिलेली नव्हती.हॉस्पिटलचे 'सीईओ' अमोल होळकुंडे यांनी मात्र सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्याचे पत्र महापालिकेला दिले होते. त्याबाबत तक्रार आल्यानंतर तत्कालीन आयुक्तांच्या आदेशानुसार वैद्यकीय अधिकाऱ्यांनी पाच आक्टोबर २०२० रोजी संबंधित सेंटरची पाहणी केली. त्या वेळी रुग्णांसाठीच्या सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले होते. शिवाय, रुग्ण कमी झाल्यामुळे बहुतांश कोविड सेंटर १५ सप्टेंबरच्या आदेशाद्वारे बंद केली होती. असे असतानाही एक ऑगस्ट ते ३० आक्टोबर २०२० या कालावधीचे बिल स्पर्शने सादर केले होते. तेव्हा तत्कालीन अतिरिक्त आयुक्तांनी आयुक्तांची परवानगी न घेता स्पर्शला तीन कोटी २९ लाख ४० हजार रुपये देण्याचा आदेश दिला होता. त्यापैकी अनामत वजा करून तीन कोटी १४ लाख एक हजार ९०० रुपये दिले होते. या प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते सुनील कांबळे यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी होऊन उच्च न्यायालयाने महापालिका आयुक्तांना चौकशी करून निर्णय घेण्याचा आदेश दिला होता. त्यानुसार चौकशी केल्यानंतर सत्यता आढळली आहे. त्यामुळे ती रक्कम वसूल करण्याचा आदेश आयुक्तांनी दिला आहे.

# ‘स्वच्छ तीर्थ अभियान’ राबविण्यास सुरूवात

## १ जानेवारीपर्यंत शहरातील सुमारे ५३ मंदिरांची होणार स्वच्छता

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने स्वच्छ तीर्थ अभियान राबविण्यास सुरूवात केली आहे. या अंतर्गत २१ जानेवारीपर्यंत शहरातील सुमारे ५३ मंदिरांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली आहे. अयोध्येमध्ये २२ जानेवारीला प्रभू श्रीरामांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापणा होणार आहे. या पार्श्वभूमीवर धार्मिक स्थळे व तेथील परिसरात स्वच्छता अभियान राबविण्याचे आदेश भारत सरकारच्या आवासन आणि शहरी कार्य मंत्रालयाच्या वतीने महापालिकेला दिले




> **“केंद्र सरकारच्या आदेशानुसार २१ जानेवारीपर्यंत शहरातील ५३ मंदिरांमध्ये स्वच्छ तीर्थ अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानात माजी नगरसेवक, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, नागरिकांनी सहभाग घ्यावा. त्याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार प्रत्येक प्रभागात सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.**
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक’**

> **“स्वच्छ तीर्थ अभियानांतर्गत ज्या मंदिराची स्वच्छता केली आहे, त्याचे नाव, वॉर्ड क्रमांक, सहभागी अधिकारी, कर्मचारी, माजी नगरसेवक, संस्था, संख्या यांसह कार्यक्रमाची ५० शब्दांपर्यंत माहिती आरोग्य विभागाला देणे बंधनकारक आहे. यासाठी अशा आशयाचा एक तक्ताही तयार करण्यात आला आहे.**
> **– यशवंत डांगे,**
> **सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग**

आहेत.त्यानुसार पिंपरी चिंचवड शहरातील ५३ मंदिरात स्वच्छता मोहिम घेण्यात येणार आहे. या मोहीमेमध्ये वापरण्यायोग्य वस्तुंचे संकलन करुन क्षेत्रिय कार्यालयातील नजीकच्या आरआरआर केंद्रावर त्या जमा करणे, मंदिर परिसरात निर्माण होणारा निर्माल्य कचरा संकलित करण्यासाठी निर्माल्य कलशांची व्यवस्था करणे, प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करणे आदी सूचना देण्यात आल्या आहेत. क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, मंदिराचे पदाधिकारी, कर्मचारी, वॉर्डमधील माजी नगरसेवक, नागरिक, शाळा कॉलेजमधील विद्यार्थी, सेवाभावी संस्था, महिला बचत गट यांना सहभागी करुन मोहिम राबवली जाईल. दररोज स्वच्छ तीर्थ अभियान मोहिमेपुर्वीचे, मोहिम करताना व मोहिम झाल्यानंतरचे ५ जीओ टॅग छायाचित्रण करुन स्वच्छ भारत अभियानाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात येणार आहेत. पिंपरी चिंचवड शहरात आठ क्षेत्रीय कार्यालये असून ३२ प्रभाग आहेत. या सर्व प्रभागात सखोल स्वच्छता मोहिम राबविण्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्देश दिले आहेत. त्यानुसार सकाळी सात ते दुपारी दोन वाजेपर्यंत शहराच्या विविध भागातील रस्ते, चौकात स्वच्छता अभियान राबविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तसेच रस्ते, चौक पाण्याने स्वच्छ धुवून काढण्यात येणार आहेत. यासाठी वाहतूक पोलिसांशी समन्वय साधला जात असल्याचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले.

# पिंपळेगुरवमध्ये नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर मोठी कारवाई

## ८ वाहने जप्त करत केला ७० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पिंपळे गुरव येथील मोरया पार्क, कृष्णराज कॉलनी, अमृता कॉलनी, भाऊनगर, मुक्तांगण लॉन्स, देवकर पार्क, शिवनेरी कॉलनी या भागांतून वारंवार ट्रक, ट्रॅक्टर, डंपर, टेम्पो अशी वाहने भरुन राडारोडा नदीकाठी टाकला जात असल्याची तक्रार पर्यावरण विभागास प्राप्त झाली होती. त्यानंतर पर्यावरण विभागाने प्रत्यक्ष पाहणी करुन संबंधित वाहनचालकांवर कारवाई केली आहे.







नदीपात्रात भराव करणारे नितीन दर्शिले यांचे ४ हायवा ट्रक, दामोदर तळमट्टी यांचा ट्रॅक्टर, नागनाथ मंजुळे यांचा एक टेम्पो, लकाप्पा पुजारी यांचा एक टेम्पो, राठोड यांचा एक ट्रॅक्टर अशी आठ वाहने महापालिकेने जप्त केली आहेत. तसेच या वाहनमालकांकडून एकुण ७० हजार ५०० रुपये दंड वसुल करण्यात आला आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार आणि पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आरोग्य निरीक्षक अमोल गोरखे तसेच मल्टिपर्पज वर्कर गोरक्षनाथ करपे यांनी ही कारवाई केली. या कारवाईमध्ये पर्यावरण पथकाचा तसेच एमएसएफ व मेस्को जवानांच्या पथकांचाही सहभाग होता. नदीपात्रात भराव टाकल्यामुळे नदीचे पात्र अरूंद होत असून नदीप्रदूषण होत आहे. त्यामुळे यापुढे नदीपात्रात भराव टाकणाऱ्यांवर तातडीने कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या कारवाईसाठी महापालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने पथकांची नेमणूक करण्यात आली आहे. पथकांमध्ये सुरक्षारक्षक आणि कामगारांचा समावेश असून नदीमध्ये भराव टाकणाऱ्या जागामालक, गाडी मालक, वाहन चालकावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. तसेच वाहनेही जप्त करण्यात येतील, अशी माहिती सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांनी दिली.

# शहरी गरीब कार्डचे आपोआप नूतनीकरण

## शहरी गरीब कार्ड पहिले चार महिनेच मिळणार

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या वतीने बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्रात कृषी प्रदर्शनाची पाहणी आमदार रोहित पवारांनी केली. १८ ते २२ दरम्यान कृषी विज्ञान केंद्रात कृषी प्रदर्शन होणार आहे. या कृषी प्रदर्शनाला राज्यभरातून लोक येत असतात. ज्या प्रमाणे शेतकरी येत असतात त्याच प्रमाणे राजकिय नेते देखील येत असतात आज रोहित पवारांनी प्रदर्शनाची पाहणी केली. यावेळी त्यांनी प्रतिक्रिया दिली. शेतकऱ्यांना इथे नवीन प्रयोग पाहायला मिळत आहेत. उत्पन्न दुप्पट करायचा प्रयोग इथं होत आहे. पाण्याचं व्यवस्थापन करायचं, असं झालं तर दुष्काळातून बाहेर पडू शकतो, असे रोहित पवार म्हणाले. दाओसला ज्या कंपनीत काल करार केले, त्या सगळ्या कंपन्याचे ऑफिस मुंबईत आहेत. मग इथे करार का केला



नाही? दाओस ला का जावे लागले? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. अदाणी यांना मुख्यमंत्री दावोसमध्ये भेटले, तिकडे भेटायचे कारण काय होत? गुजरातला २६ हजार कोटींची तरतूद येते, महाराष्ट्रामध्ये का येत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रावर वरून दबाव होता, जर महाराष्ट्रामध्ये उद्योग आले तर तिकडे काही राहणार नाहीत. मागच्या वर्षी एका कंपनीसोबत ३ कोटींचा करार केला. आणि करार दाखवले की २० हजार कोटीचे करार करायचा म्हणून करू नका, असे रोहित पवार म्हणाले. केंद्रीय तपास यंत्रणा काम करीत असतात. धाड टाकली म्हणून आम्ही शांत बसलो नाही. मराठी घाबरत नाहीत. माझ्यावर कारवाई करणारे नेते हे मी जे व्यवसाय करतात तेच नेते असतील. आम्ही आधी व्यवसायात आलो मग राजकारणात आलो. चोरीचा पैसा राजकारणात वापरत नाही, तुम्ही व्यवसाय करून चोरीचा पैसा राजकारणात वापरतात, असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला. भाजपकडे नेते नाहीत. जेव्हा शिंदे आणि अजित पवार मित्रमंडळींना मंत्रिपद मिळाले. भाजपकडे नेते नाहीत त्यामुळे बाकीच्या पक्षातील लोकांना भाजप घेते. भाजपचे खायचे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत, असे रोहित पवार म्हणाले. अजित पवारांचा व्हिडीओ पाहून वाईट वाटलं. रुबाब आहे पण तो रूबाब सोडू नये. भाजप त्यांची ताकद कमी करायचा प्रयत्न करत आहे असे तो व्हिडीओ बघून वाटतं, असे रोहित पवार म्हणाले. भाजपला लोकनेते आवडत नाही.भाजपने अनेक लोकांची ताकद कमी केली, त्यांच्याच नेत्यांची ताकद कमी केली. अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना भाजपच्या चिन्हावर लढावे लागेल लिहून ठेवा, असे रोहित पवार म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेसचा आश्चर्यकारक निकाल लागेल. लोकांच्या मनात आहे तो निकाल लागेल. ज्याअर्थी भाजप नेते म्हणतात अजित पवार यांच्या बाजूने निकाल लागेल, लिहून ठेवा त्याअर्थी तसा निकाल लागणार नाही, असा विश्वास रोहित पवारांनी व्यक्त केला.

शेतकऱ्यांना इथे नवीन प्रयोग पाहायला मिळत आहेत. उत्पन्न दुप्पट करायचा प्रयोग इथं होत आहे. पाण्याचं व्यवस्थापन करायचं, असं झालं तर दुष्काळातून बाहेर पडू शकतो, असे रोहित पवार म्हणाले. दाओसला ज्या कंपनीत काल करार केले, त्या सगळ्या कंपन्याचे ऑफिस मुंबईत आहेत. मग इथे करार का केला नाही? दाओस ला का जावे लागले? असा सवाल रोहित पवार यांनी उपस्थित केला. अदाणी यांना मुख्यमंत्री दावोसमध्ये भेटले, तिकडे भेटायचे कारण काय होत? गुजरातला २६ हजार कोटींची तरतूद येते, महाराष्ट्रामध्ये का येत नाही? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराष्ट्रावर वरून दबाव होता, जर महाराष्ट्रामध्ये उद्योग आले तर तिकडे काही राहणार नाहीत. मागच्या वर्षी एका कंपनीसोबत ३ कोटींचा करार केला. आणि करार दाखवले की २० हजार कोटीचे करार करायचा म्हणून करू नका, असे रोहित पवार म्हणाले. केंद्रीय तपास यंत्रणा काम करीत असतात. धाड टाकली म्हणून आम्ही शांत बसलो नाही. मराठी घाबरत नाहीत. माझ्यावर कारवाई करणारे नेते हे मी जे व्यवसाय करतात तेच नेते असतील. आम्ही आधी व्यवसायात आलो मग राजकारणात आलो. चोरीचा पैसा राजकारणात वापरत नाही, तुम्ही व्यवसाय करून चोरीचा पैसा राजकारणात वापरतात, असा हल्लाबोल रोहित पवारांनी केला. भाजपकडे नेते नाहीत. जेव्हा शिंदे आणि अजित पवार मित्रमंडळींना मंत्रिपद मिळाले.

# वाहन उद्योगातील नवतंत्रज्ञान उलगडणार!

## ‘एआरएआय’च्या वतीने सिअॅट २०२४ चे पुण्यात आयोजन

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** वाहन उद्योगातील नवतंत्रज्ञान उलगडून दाखविणाऱ्या १८ व्या सिम्पोझियम ऑन इंटरनॅशनल ऑटोमोटिव्ह टेक्नोलॉजी अर्थात सिअॅट २०२४ चे आयोजन २३ ते २५ जानेवारी दरम्यान करण्यात आले आहे. भारतीय वाहन उद्योगाची नियामक संस्था असलेल्या ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाने (एआरएआय) ही द्विवार्षिक परिषद आयोजित केली आहे. ही परिषद मोशी येथील पुणे इंटरनॅशनल एक्सिबिशन अँड कन्व्हेंशन सेंटर (पीआयईसीसी) येथे होईल. एआरएआयचे संचालक आणि सिअॅट २०२४ चे अध्यक्ष डॉ. रेजी मथाई यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक व सिअॅटचे निमंत्रक विक्रम शिंदे, एआरएआयचे उपसंचालक व सिअॅट एक्स्पोचे समन्वयक विजय पंखावाला, एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक नितीन धांडे व आनंद देशपांडे, डॉ. सुकृत ठिपसे आदी उपस्थित होते. सिअॅट २०२४ चे उद्घाटन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रगतीशील गतिशीलतेच्या दिशेने परिवर्तन ही परिषदेची यावर्षीची संकल्पना आहे. यासोबतच अत्याधुनिक एनव्हीएच विकास केंद्र, ॲक्सिलरेटेड स्लेड लॅब, फोटोमेट्री प्रयोगशाळा, मोबिलिटी रिसर्च सेंटर (एमआरसी), टाकवे येथे उभारण्यात येत असलेली एडीएएस प्रणाली, सिलिंडर चाचणी आणि हाय एनर्जी इंम्पॅक्ट टेस्टिंग सुविधा यासारख्या नवीन सुविधांचे उद्घाटनही यावेळी होईल, असे डॉ. मथाई यांनी सांगितले. सिअॅट २०२४ मध्ये होणाऱ्या परिसंवादांत दीड हजारहून अधिक वाहनउद्योग क्षेत्रातील तंत्रज्ञ सहभागी होतील. नऊ देशांतील तांत्रिक तज्ज्ञ हे ४८ तांत्रिक सत्रांमध्ये त्यांचे संशोधनकार्य येथे सादर करतील आणि त्यावर चर्चाही करतील. याव्यतिरिक्त सिअॅटच्या संकल्पनेवर विविध चर्चासत्रांचे आयोजनही करण्यात आले असल्याची माहिती विक्रम शिंदे यांनी दिली.

एआरएआयचे संचालक आणि सिअॅट २०२४ चे अध्यक्ष डॉ. रेजी मथाई यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक व सिअॅटचे निमंत्रक विक्रम शिंदे, एआरएआयचे उपसंचालक व सिअॅट एक्स्पोचे समन्वयक विजय पंखावाला, एआरएआयचे वरिष्ठ उपसंचालक नितीन धांडे व आनंद देशपांडे, डॉ. सुकृत ठिपसे आदी उपस्थित होते. सिअॅट २०२४ चे उद्घाटन केंद्रीय अवजड उद्योग मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडे यांच्या हस्ते होणार आहे. प्रगतीशील गतिशीलतेच्या दिशेने परिवर्तन ही परिषदेची यावर्षीची संकल्पना आहे. यासोबतच अत्याधुनिक एनव्हीएच विकास केंद्र, ॲक्सिलरेटेड स्लेड लॅब, फोटोमेट्री प्रयोगशाळा, मोबिलिटी रिसर्च सेंटर टाकवे येथे उभारण्यात येत असलेली एडीएएस प्रणाली, सिलिंडर चाचणी आणि हाय एनर्जी इंम्पॅक्ट टेस्टिंग सुविधा यासारख्या नवीन सुविधांचे उद्घाटनही यावेळी होईल, असे डॉ. मथाई यांनी सांगितले.

# छत्रपतींच्या जिगरबाज सैनिकांचा मर्दमावळ्यांचा तालुका मावळ!

## राज्यपाल रमेश बैस यांचे प्रतिपादन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** विकसित भारत संकल्प यात्रा हा समृद्ध महाराष्ट्र निर्माण करण्याचा संकल्प असून, मावळ तालुक्यातील अखेरच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा ध्यास घेऊन विकसित भारत संकल्प यात्रा मावळात आली असल्याचे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी केले. कान्हे येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये बुधवार (दि. १७) विकसित भारत संकल्प यात्रेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रमेश चव्हाण, प्रांताधिकारी सुरेंद्र नवले, पोलिस उपअधीक्षक सत्यसाई कार्तिक, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, कान्हे ग्रामपंचायतचे सरपंच विजय सातकर, तहसीलदार विक्रम देशमुख, गटविकास अधिकारी सुधीर भागवत आदी उपस्थित होते. राज्यपाल रमेश बैस म्हणाले की, पुणे शहराशी निगडित असल्याने मावळ तालुक्यात शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. पुण्याशी जोडले गेल्याने या परिसराचे शहरीकरणही वेगाने होत आहे, मावळ तालुक्यात लेण्या, किल्ले, सिंचन प्रकल्प, घाट रस्ते आणि मोठ्या प्रमाणात फुलशेती असल्याने पर्यटन विकासाला खूप वाव आहे. नागरिकांना स्वच्छता सुविधा, आवश्यक वित्तीय सेवा, वीजजोडणी, गॅस सिलिंडर सुविधा, गरिबांना हक्काचे घर, खाद्य सुरक्षा, उपयुक्त पोषण, आरोग्य सुविधा, स्वच्छ पिण्याचे पाणी यासारख्या शासनाच्या योजनांचा लाभ देणे हा विकसित भारत संकल्प यात्रेचा भर आहे. या सुविधांपासून वंचित असलेल्यांपर्यंत पोहोचणे हा यात्रेचा उद्देश आहे.यात्रेच्या माध्यमातून शासन आपल्या दारी आले आहे. लोकसहभागाद्वारे ही यात्रा यशस्वी होऊन पात्र लाभार्थ्यांना खर्या अर्थाने लाभ मिळू शकेल. यावर्षी ग्रामीण भाग आणि आदिवासी समाजाच्या विकासावर शासनाने लक्ष केंद्रित केले आहे. २०४७ पर्यंत विकसित भारताचे उद्दीष्ट गाठण्यासाठी समाजातील वंचित घटकांचे जीवनमान उंचावणे गरजेचे आहे. पात्र लाभार्थ्यांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचवून विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून असा प्रयत्न होत असल्याचेही त्यांनी सांगितले.




### लाभार्थ्यांना देण्यात आला लाभ

**» या वेळी, मावळ तालुक्यातील विविध योजनांचा लाभ घेतलेल्या प्रतिनिधिक स्वरूपातील २० लाभार्थ्यांना राज्यपाल बैस यांच्या हस्ते लाभ देण्यात आला. या वेळी लाभार्थी स्वप्नाली टाकळकर, निलेश ओव्हाळ यांनीही मनोगत व्यक्त केले, शिवाजी जराड यांनी सूत्रसंचालन केले तर गटविकास अधिकारी सुधीर भागवत यांनी आभार मानले. कार्यक्रमस्थळी, विविध शासकीय योजनांचे कक्ष लावण्यात आले होते. पोलिस निरीक्षक कुमार कदम यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.**

# सात होर्डिंगचालकांचा परवाना पालिकेने केला रद्द

## आठ जणांवर फौजदारी गुन्हा करण्यात आला दाखल

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** रस्त्यांवरील जाहिरात होर्डिंग चांगल्या प्रकारे दिसावे म्हणून शहरात अनेक ठिकाणी झाडांची कत्तल केली जाते. अशा प्रकारे झाडांची कत्तल करणार्या ७ होर्डिंगधारकांचे परवाने महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाने रद्द केले आहेत. तसेच, चिखली येथे झाडे तोडणार्या आठ जणांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरभरात मोठ्या प्रमाणात जाहिरात होर्डिंग लावण्यात आले आहेत. बांधकाम व्यावसायिकांचेही मोठमोठे जाहिरात होर्डिंग आहेत. या होर्डिंगवरील जाहिराती दिसाव्यात म्हणून पदपथावरील झाडे तोडण्यात येतात. तसेच, फांद्या छाटण्यात येतात. त्यामुळे ती झाडे मरून जातात. अशा घटना शहरात सातत्याने घडत आहेत. या संदर्भात पर्यावरण व



वृक्षप्रेमींनी तक्रार केल्यानंतर महापालिका प्रशासनाकडून कारवाई केली जाते.त्या तक्रारींनुसार महापालिकेने वरील कारवाई केली आहे. होर्डिंगधारकांनी आपल्या होर्डिंगसमोरील झाडांची छाटणी किंवा तोडणी करू नये. महापालिकेच्या परवानगीशिवाय वृक्षतोड केल्यास महाराष्ट्र शासन जाहिरात नियमन व नियंत्रण नियमानुसार जाहिरात होर्डिंगधारकाचा परवाना रद्द करून जाहिरातदाराविरोधातसुध्दा कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा आयुक्त शेखर सिंह यांनी दिला आहे.चिखली परिसरामध्ये अनधिकृतपणे झाडे तोडणार्यांवर मंगळवारी (दि.१६) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनधिकृत वृक्षतोड केल्याप्रकरणी आतापर्यंत आठ होर्डिंगधारकांवर पोलिसांच्या वतीने गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच, अनधिकृत वृक्षतोड केल्याप्रकरणी नऊ कार्यक्षेत्रातील पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. काही प्रकरणांची तपासणी सुरू आहे. आजपर्यंत १० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. रस्त्यालगत असलेले होर्डिंग दिसत नसल्यामुळे झाडांची संबंधित होर्डिंगधारकांकडून विनापरवाना छाटणी किंवा तोड केली.